# SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

**(formerly University of Pune)**

**INTERNATIONAL CENTRE**

**(ISO 9001:2015)**

Ganeshkhind, Pune - 411007
Phone : 020-25691162
: 25601291/2
Tele Fax : 91-020-25691954
E-mail : intcent@unipune.ac.in


Ref.No.: IC / 851 Date : 13/08/2021

**To,**
**The Head of Department / Principal / Director,**
**All Departments / Colleges / Institutions affiliated to**
**Savitribai Phule Pune University**

**Subject:** - Regarding International Student's Admission Process Fees.

**Dear Sir / Madam,**

As per the Management Council Resolution No. 32/280121, it has decided that the International Student's Admission Process Fees of the international students who are admitted under the ICCR Scholarship has to be submitted to the University by Demand Draft.

In this regard, we would like to inform you that from the academic year 2021-22, all the concerned Colleges / Institutions / University Departments are requested to collect the entrance fee from ICCR office and submit to the university by demand draft.

| Fee Title | Admission Process Fee |
|---|---|
| **International Student's Admission Process Fees** per Student | **Rs. 72722/-** |

Thanking you

12/8/2021

**Prof. (Dr.) Vijay Khare**
**Director**
**International Centre**
**Savitribai Phule Pune University**

INTERNATIONAL CENTRE Formerly University Of Pune Savitribai Phule Pune University

Enclosed: Management Council Resolution No. M.32 / 280121

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## व्यवस्थापन परिषद : दि. २४ जुलै, २०१९

मा. कुलसचिव यांनी मा. कुलगुरु यांचे परवानगीने खालील आयत्यावेळचा विषय मांडला.

४८ प्रव-अ-२९३/२४०७१९ आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांकरीता आंतरराष्ट्रीय केंद्र व व्यवस्थापनशास्त्र विभाग यांच्या समन्वयाने बीबीए (आयबी) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९—२० पासून सुरू करण्याबाबत.

(आंतरराष्ट्रीय केंद्र)

टीप : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, आंतरराष्ट्रीय केंद्रामार्फत आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना विद्यापीठाशी संलग्नित विभाग/महाविद्यालये/संस्थेमध्ये पदवी, पदव्युत्तर पदवी, एम. फिल. व पीएच. डी. अभ्यासक्रमाकरीता प्रवेश दिला जातो. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, आंतरराष्ट्रीय केंद्रामध्ये सध्या English Language Intensive Course for International Students (ELICIS), Remedial Course, Soft Skills Development Programme अंतर्गत RECUS (Remedial English Coaching for University Students) कोर्स विद्यापीठ विभागातील विद्यार्थ्यांकरिता व विद्यापीठातील शिक्षकेतर सेवकांसाठी चालवित आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विविध देशातील विद्यापीठांशी शैक्षणिक करार असल्याने त्याअंतर्गत क्यॅज्युल विद्यार्थ्यांची आदान—प्रदान होते. त्यासंबंधातील प्रवेशाचे कामकाजही आंतरराष्ट्रीय केंद्रामार्फत पाहिले जाते. तसेच विविध देशाचे प्रतिनिधी शैक्षणिक कराराअंतर्गत आंतरराष्ट्रीय केंद्रास वारंवार भेट देतात आणि आपल्या विद्यापीठाचे प्रतिनिधीही परदेशात शैक्षणिक कामासाठी जातात. याबाबतचे सर्व कामकाज आंतरराष्ट्रीय केंद्रामार्फत पाहिले जाते.

आंतरराष्ट्रीय केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यानंतर सदरील विद्यार्थी विद्यापीठाशी संलग्नित विभाग/महाविद्यालये/संस्थेमध्ये शिक्षणासाठी जातात. परंतु विद्यापीठाच्या रॅंकिंगसाठी त्याचा उपयोग होत नाही तसेच बीबीए या कोर्ससाठी मोठी मागणी होत आहे परंतु विद्यापीठाचे बीबीए (Bachelor in Business Administration) व बीबीए (आयबी) [Bachelor in Business Administration (International Business)] हे अभ्यासक्रम फक्त महाविद्यालयांमध्ये राबविले जातात त्यामुळे सदरील अभ्यासक्रमाकरीता विद्यार्थ्यांना नाईलाजास्तव महाविद्यालयांमध्ये प्रवेश घ्यावा लागतो. या अभ्यासक्रमाकरीता आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांची तसेच आय.सी.सी.आर. शिष्यवृत्तीतर्गत प्रवेश घेणा—या विद्यार्थ्यांची संख्या मोठया प्रमाणात आहे. आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांकरीता त्यांच्या निकडीनुसार बीबीए (आयबी) हा अभ्यासक्रम योग्य ठरेल.

या विद्यार्थ्यांच्या मागणीचा विचार करून आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांकरीता आंतरराष्ट्रीय केंद्र व व्यवस्थापनशास्त्र विभाग यांच्या समन्वयाने बीबीए (आयबी) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९—२० पासून सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. हा अभ्यासक्रम आंतरराष्ट्रीय केंद्रामध्ये राबविला जाणार असून त्याकरीता आंतरराष्ट्रीय केंद्रामध्ये सुसज्ज वर्ग व इतर साधन सामुग्री उपलब्ध आहे. या अभ्याक्रमाचे शैक्षणिक व अध्यापनासंबंधित सर्व कामकाज व्यवस्थापनशास्त्र विभागामार्फत आणि प्रवेश प्रक्रिया व प्रशासकीय कामकाज आंतरराष्ट्रीय केंद्रामार्फत करण्यात येईल. बीबीए (आयबी) या अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता ६० प्रस्तावीत असुन फक्त आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल.

सबब शैक्षणिक वर्ष २०१९—२० पासून आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांकरीता आंतरराष्ट्रीय केंद्र व व्यवस्थापनशास्त्र विभाग यांच्या समन्वयाने बीबीए (आयबी) हा अभ्यासक्रम ६० विद्यार्थ्यांच्या प्रवेश क्षमतेसह आंतरराष्ट्रीय केंद्रामध्ये सुरू करण्याकरीता तसेच प्रत्येक विद्यार्थ्याकडून विद्यापीठाच्या विहीत नियमाप्रमाणे शुल्क आकारण्याकरीता मा. व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मा. कुलगुरू यांच्या मान्यतेसाठी सविनय सादर.)

म: ३१४/२४०७१९

असा ठराव करण्यात येतो की, आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांकरीता आंतरराष्ट्रीय केंद्र व व्यवस्थापनशास्त्र विभाग यांच्या समन्वयाने बीबीए (आयबी) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९--२० पासून आंतरराष्ट्रीय केंद्रामध्ये सुरू करण्यास व विद्यापीठाच्या विहित नियमाप्रमाणे शुल्क आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ★ सभा व दप्तर विभाग ★

**उपकुलसचिव**
**सभा व दप्तर**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**पुणे-४११००७.**